# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल बान्द्रा (पुर्व),मुंबई ४०० ०५१ .

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ५५ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

*******

| | | |
|---|---|---|
| बैठक स्थळ | :- | मा. कामगार आयुक्त यांचे कार्यालय, ४था मजला समिती सभागृह ई -ब्लॉक, सी-२० वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१ |
| दिनांक | :- | १३.०७.२०२० (सोमवार) |
| वेळ | :- | दुपारी २.०० वाजता |



Scanned with CamScanner

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १३.०७.२०२० रोजी संपन्न झालेल्या ५५ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील, मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५५ वी बैठक सोमवार दिनांक १३.०७.२०२० रोजी दुपारी ०२.०० वा. मा. कामगार आयुक्त यांचे कार्यालय, समिती सभागृह, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव समक्ष/व्हिडीओ-कॉन्सफरिंग द्वारे बैठकीत उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील | मा.मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. महेंद्र कल्याणकर, कामगार आयुक्त | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. शशांक साठे, सह सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी- व्हिडीओ- कॉन्सफरिंग |
| ६. | मा. श्रीम. वेदा आगटे | मालक प्रतिनिधी- व्हिडीओ- कॉन्सफरिंग |
| ७. | मा. श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी- व्हिडीओ- कॉन्सफरिंग |
| ८. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| ९. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय,कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, मा. अपर मुख्य सचिव, मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक १३.०३.२०२० रोजीच्या मंडळाच्या ५४ व्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.



Scanned with CamScanner

**विषय क्र.०१ :- मंडळाच्या दि.१३.०३.२०२० रोजी संपन्न ५४ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. ना. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५४ वी बैठक दिनांक १३.०३.२०२० रोजी दुपारी ४.०० वा. समिती सभागृह दालन क्र.५०६ ॲनेक्स बिल्डींग मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तांतास मा. अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली आहे. मंजूर इतिवृत्तांताची प्रत मंडळाच्या सर्व सन्मानीय सदस्यांना दि.१८.०३.२०२० रोजी ई-मेलद्वारे पाठवून बदल असल्यास सूचविणेबाबत कळविण्यात आले होते. मंडळाच्या ५४ व्या बैठकीत मंजूर ठरावास अनुसरून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळ बैठकीत सादर करण्यात आला.

सदर इतिवृत्तांत काही बदल करावयाचे असल्यास त्या बदलासह इतिवृत्तांत कायम करणे प्रस्तावित आहे.

**ठराव क्र. ५५(१)/२०२०:- मंडळाच्या दि.१३.०३.२०२० रोजीच्या ५४ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०२:- कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावाच्या काळात शासन मान्यतेने नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना रू.२०००/- एवढे अर्थसहाय्य थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले. सदर बाब मंडळाच्या माहितीस्तव सादर.**

याबाबत मंडळाच्या सचिव यांनी सादर केले की, केंद्र व राज्यामध्ये लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊन कालावधीत मंडळाकडील सादर प्रस्तावाला अनुसरून मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना प्रत्येकी रू.२०००/- अर्थसहाय्य थेट त्यांच्या बँक खात्यात त्यांच्या DBT पध्दतीने जमा करण्याचा निर्णय शासनाच्या दि.१८.०४.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आला होता. तसेच, जिल्हा कार्यालयातील गर्दी टाळण्याच्या दृष्टीने अर्थसहाय्याचे जिल्हा कार्यालयाऐवजी मंडळाच्या मुख्यालय स्तरावरून वाटपाचा निर्णय घेण्यात आला होता. सदर निर्णयास अनुसरून जिल्हाकार्यालयाकडून नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचा डेटा प्राप्त करून दि.२०.०७.२०२० ते ०८.०७.२०२० या



Scanned with CamScanner

कालावधीत ८,८९,१८९ नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना अर्थसहाय्याचे वाटप करण्यात आले. सदर अर्थसहाय्य वाटपावर रू.१७८.२३ कोटी एवढा खर्च झालेला आहे. ज्या बांधकाम कामगारांच्या डेटामध्ये त्रुटी आढळली असा १,५८,३२२ बांधकाम कामगारांचा डेटा दुरूस्तीकरीता संबंधित जिल्हा कार्यालयांना पाठविण्यात आला आहे. सदर डेटा दुरूस्त करून प्राप्त झाल्यानंतर त्यांच्याही बँक खात्यात अर्थसहाय्याचे वाटप जमा करण्यात येईल. गडचिरोली जिल्हयातील ९०३ बांधकाम कामगारांच्या खात्यामध्ये नजरचुकीने रू.२०००/- ऐवजी रू.२०,०००/- चे अर्थसहाय्य जमा करण्यात आले होते. सदर अतिप्रदानाच्या रक्कमेची बहुतांश वसूली करण्यात आलेली आहे. शिल्लक ४९ बांधकाम कामगारांच्या अतिप्रदानाच्या वसूलीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५५(२)/२०२०:- मंडळ स्तरावरून सादर प्रस्तावास दि.१८.०४.२०२० रोजी शासन मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार मंडळाकडील ८,९१,१८९ नोंदित सक्रीय (जिवित) बांधकाम कामगारांच्या बँक खात्यात DBT पध्दतीने जमा अर्थसहाय्य, अर्थसहाय्य वाटपावरील खर्च रू.१७८.२३ कोटी गडचिरोली जिल्ह्यातील ९०३ नोंदित सक्रीय (जिवित) बांधकाम कामगारांना नजरचुकीने अतिप्रदान झालेल्या रक्कमेच्या वसूलीबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे, नोंदीत सक्रिय जिवीत बांधकाम कामगारांपैकी अर्थसहाय्य वाटप न झालेल्या बांधकाम कामगाराचा प्रलंबित डाटा प्राप्त करून अर्थसहाय्याचे वाटप करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०३:- कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावाच्या काळात बांधकामाच्या ठिकाणावरील नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारइ व बारामती, पुणे येथील बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन व रात्रीच्या जेवणाच्या वितरणास मान्यता देणेबाबत**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, लॉकडाऊन कालावधीमध्ये क्षेत्रिय कार्यालये, विकासक/ कंत्राटदार यांच्याकडून प्राप्त मागणीस अनुसरून बांधकामाच्या ठिकाणावर अडकलेल्या नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन व रात्रीचे भोजनही वितरीत करण्यात आले. लॉकडाऊन कालावधीमध्ये बांधकामे बंद असल्याने बांधकाम कामगारांच्या हिश्याची रक्कम रू.०५/- प्रति भोजन वसूल न करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच मे. क्रेडाई यांनी मा. उपमुख्यमंत्री महोदयांना केलेल्या



Scanned with CamScanner

विनंतीनुसार बारामती जिल्हा पुणे येथील साधारणत: ११०० बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन व रात्रीचे भोजन वितरीत करण्यात आलेले आहे. सदर कार्यवाहीस मंडळाच्या कार्योत्तर मंजूरीकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५५(३)/२०२०:- कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावाच्या कालावधीत बांधकामाच्या ठिकाणावर उपस्थित नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत भोजन, रात्रीचे भोजन वितरण, कामगार हिश्याची रक्कम प्रतिभोजन रू.०५/- वसूल न करणे व बारामती जिल्हा पुणे येथील बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन व रात्रीचे जेवण वितरण करण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मध्यान्ह भोजन व रात्रीचे जेवण वितरणाची सदर कार्यवाही माहे नोंव्हेबर २०२० पर्यंत सुरू ठेवावी, तद्नंतरच्या कार्यवाहीबाबत मंडळाच्या आगामी बैठकीत स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०४:- कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावाच्या काळात बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाबाबत अनुसरावयाची कार्यपध्दतीस मंडळाची मान्यता प्रदान करणेबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत, मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या एकात्मिक कामकाजाचा अंतर्भाव असणारी एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS) विकसीत करण्यासाठी मे. आई टी आई लिमिटेड आणि मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. यांची निवड करण्यात आली होती. नियुक्त संस्थेने नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाची संगणक प्रणाली विकसित करून कार्यन्वित केलेली आहे. जिल्हा स्तरावरील मंडळाच्या कामकाजाकरीता जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. ०९ विभागीय/ जिल्हा कार्यालय स्थापनेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. १६ जिल्हा कार्यालय स्थापनेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. उर्वरित ०८ जिल्हयात जागेची निवड करण्यात आलेली व ०८ जिल्हयामध्ये जागेचा शोध प्रगतीपथावर आहे. याबाबतचा जिल्हानिहाय तपशील मंडळास सादर करण्यात आला.

कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भाव कालावधीत ऑफलाईन ऐवजी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप करणे आवश्यक आहे. राज्यातील जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेची प्रगती विचारात घेऊन ऑनलाईन पध्दतीने नोंदणी,



Scanned with CamScanner

नुतनीकरण व लाभवाटपाची सविस्तर कार्यवाही मंडळ सचिवांनी विशद केली. याशिवाय सद्यस्थितीत मे. ब्रिस्क् प्रा.लि. या संस्थेमार्फत नियुक्त कर्मचाऱ्यांचा जिल्हा निहाय तपशील मंडळास सादर करण्यात आला व विभागीय / जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरीता मंजूर आकृतीबंधाच्या मर्यादेत मंडळ, असंघटीत मंडळ व नियुक्त संस्थेचे कर्मचारी असावे, ही बाब मंडळास सादर करण्यात आली. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५५(४)/२०२०:- कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावाच्या काळात ऑनलाईन पध्दतीने बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाबाबत अनुसरावयाच्या प्रस्तावित कार्यपध्दतीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन झालेल्या जिल्हयात ऑनलाईन पध्दतीचा त्वरीत वापर करावा व अन्य जिल्हयातही ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाच्या कार्यवाहीस प्राधान्य देण्यात यावे. विभागीय व जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेच्या कार्यवाहीस गती देण्यात यावी व विभागीय कार्यालये -०८ व जिल्हा कामगार सुविधा केंद्र- १६ करीता मंजूर आकृतीबंधाच्या मर्यादेत मंडळ, असंघटीत मंडळ व नियुक्त संस्थेच्या कर्मचाऱ्यांची संख्या असावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०५:- कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावाच्या काळात मंडळाकडे नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचा मृत्यू कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास अर्थसहाय्य देणेबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भाव कालावधीत लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊन मध्ये टप्प्या टप्प्याने सूट देण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये इमारत व इतर बांधकामे सुरू होणे अपेक्षित आहे. भविष्यात बांधकामाच्या ठिकाणी काम करताना नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कोविड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव झाल्यास व त्यामुळे बांधकाम कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास सदर बांधकाम कामगारांच्या वारसास रू.५.०० लक्ष अर्थसहाय्य वाटपाचा प्रस्ताव मंडळाच्या विचारविनिमयाकरीता सादर करण्यात आलेला आहे. सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.



Scanned with CamScanner

**ठराव क्र. ५५(५)/२०२०:- मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसास रू.२.०० लक्ष अर्थसहाय्य देण्यात येते, कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचा दुर्देवी मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसानांही या योजनचा लाभ देण्यात यावा. सदर योजना मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) १८ ते ६० वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना लागू करावी याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा व शासन मान्यतेअंती पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०६:- नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या सुधारित गृहपयोगी वस्तू संचास मान्यता देणेबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वाटपाचा निर्णय मंडळाच्या दि. ०३.०६.२०१९ रोजीच्या ५१ व्या बैठकीत घेण्यात आला होता. सदर योजनेस शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. तथापि, सदर निविदा प्रक्रिये दरम्यान महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघाने हरकत नोंदवित गृहपयोगी संचातील संतरजी व चादर या वस्तू हातमाग महासंघाकरीता राखीव असल्याने सदर वस्तू निविदेमधून वगळण्यात याव्यात अशी विनंती केली होती. सदर वस्तू वगळल्यास निविदा संचाच्या अंदाजित रक्कमेत तफावत येऊन निविदेच्या बहुतांश अटी शर्ती बदलाव्या लागत असल्याने सदर निविदा प्रक्रिया शासन मान्यतेने रद्द करण्यात आली आहे. शासन मान्यतेनुसार सुधारित गृहपयोगी वस्तू संचाचा प्रस्ताव मंडळाच्या विचारविनिमयाकरीता सादर करण्यात आलेला आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | गृहपयोगी संचातील वस्तू | नग |
|---|---|---|
| १. | ताट | ०४ |
| २. | वाटया | ०८ |
| ३. | पाण्याचे ग्लास | ०४ |
| ४. | पातेले झाकणासह (१२ इंच) | ०१ |
| ५. | पातेले झाकणासह (१३ इंच) | ०१ |
| ६. | पातेले झाकणासह (१४ इंच) | ०१ |
| ७. | मोठा चमचा (भात वाटपाकरीता) | ०१ |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | गृहपयोगी संचातील वस्तू | नग |
|---|---|---|
| ८. | मोठा चमचा (वरण वाटपाकरीता) | ०१ |
| ९. | पाण्याचा जग (१.५ लीटर) | ०१ |
| १०. | मसाला डब्बा (०७ भाग) | ०१ |
| ११. | डब्बा झाकणासह (१४ इंच) | ०१ |
| १२. | डब्बा झाकणासह (१६ इंच) | ०१ |
| १३. | डब्बा झाकणासह (१८ इंच) | ०१ |
| १४. | परात | ०१ |
| १५. | प्रेशर कुकर -०५ लिटर (स्टेनलेस स्टील) | ०१ |
| १६. | कढई (स्टील) | ०१ |
| १७. | स्टीलची टाकी झाकणासह (मोठी) | ०१ |
| | **एकूण** | **३०** |

याबाबत, सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५५ (०६)/२०२० :- नोंदीत सक्रिय जिवीत बांधकाम कामगारांना वितरीत करावयाच्या गृहपयोगी वस्तू संचाचा सुधारित प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला**

**विषय क्र.०७:- बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर वसूल करावयाच्या ०१% उपकर वसुली एक रक्कमी न करता टप्प्या टप्प्याने करण्याबाबत मे. क्रेडाई यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनिमय १९९६ कलम ०३ (०१) अनुसार केंद्र शासनाची अधिसूचना दि.२६ संप्टेबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मूल्याच्या (जमिनीचे मूल्य वगळून) ०१% दराने उपकर जमा करण्यात येत आहे. सन २००७ ते माहे जून २०२० पर्यंत वर्षनिहाय जमा उपकराचा तपशील मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर उपकर वसूलीबाबत मे. क्रिडाई, औरंगाबाद यांनी माननीय महसूल मंत्री महोदयांना अग्रेषित केलेले दि. ०७.०६.२०२० चे पत्र व मा. अध्यक्ष, मे. क्रिडाई, महाराष्ट्र यांनी मा. कामगार आयुक्त यांना अग्रेषित केलेले दि. १६.०६.२०२० रोजीच्या पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

मे. क्रिडाई -महाराष्ट्र यांच्या दि. ०७.०६.२०२० रोजीच्या पत्रान्वये, एक प्रकल्प पुर्ण होण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी लागतो अश्यात कामगार कल्याण उपकर एकत्रित



Scanned with CamScanner

वसूल केल्याने बांधकाम व्यावसायीकांवर त्याचा अतिरिक्त बोजा पडत आहे. तरी आपण संदर्भित शासन निर्णयाच्या (१७.०६.२०१०) परिशिष्ट १ मधील मार्गदर्शक तत्त्वे क्र. ५ प्रमाणे एका वर्षाच्या बांधकामाच्या अंदाजित वार्षिक बांधकामाच्या एकूण खर्चाच्या १ % रक्कमेस तीन टप्पे करुन भरण्याची मुभा द्यावी अशी विनंती केली आहे.

तसेच मे. क्रिडाई-महाराष्ट्र यांच्या दि. ०७.०६.२०२० रोजीच्या पत्रान्वये, कोव्हिड-१९ व टाळेबंदी तसेच यामुळे बांधकाम क्षेत्रावर झालेला परिणाम लक्षात घेता इमारत व बांधकाम नियोक्तांकडून उपकराची रक्कम बांधकामाच्या मंजूरीच्या वेळी एकूण बांधकामाच्या खर्चाच्या १ टक्का उपकराची रक्कम एकरकमी वसुल न करता बांधकामासाठी विविध टप्प्यावर मंजूरी देतांना उपकराची रक्कम हप्तापध्दतीने वसुल करण्याची विनंती केली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे

प्रथम टप्पा -बांधकाम नकाशे मंजूरीच्या वेळी २० टक्के उपकर रक्क्म.

दुसरा टप्पा -जोते बांधकाम तपासणीवेळी २० टक्के उपकर रक्क्म.

तीसरा टप्पा – छताचे स्लॅबपर्यंत बांधकाम पूर्ण झाल्यावर २५ टक्के उपकर रक्क्म.

चौथा टप्पा– प्रथम भोगवटा प्रमाणपत्रावेळी ३५ टक्के उपकर रक्क्म.

मे. क्रेडाई यांनी सादर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५५ (०७)/२०२० :- मंडळाकडे माहे जून २०२० अखेर जमा उपकर रक्कमेची नोंद घेण्यात आली. बांधकामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर वसूल करावयाच्या ०१% उपकर वसुली एक रक्कमी न करता टप्प्या टप्प्याने करण्याबाबत मे. क्रेडाई यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची मंडळाने नोंद घेतली. याबाबत उपकर अधिनियम व उपकर नियमातील तरतूद तपासून सुधारित प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०८:- मंडळाच्या जमा उपकर निधीच्या गुंतवणुकीचा गोषवारा मंडळाच्या मान्यतेस सादर करणे व राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुकीच्या मर्यादेबाबत विचार विनीमय करणे.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या गुंतवणूक उपसमितीच्या मान्यतेने दि.०८.०७.२०२० अखेर राष्टीयीकृत बँकेत गुंतवणूक केलेल्या रू. ९३०० कोटीचा गुंतवणूकीचा बँक निहाय तपशील मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आलेला आहे. सदर



Scanned with CamScanner

गुंतवणूकीचा गोषवारा मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आलेला आहे. तसेच, राष्ट्रीयीकृत बँकांचे वेळोवेळी विलीनीकरण होत असल्याने राष्ट्रीयीकृत बँकाची संख्या कमी होत आहे त्यामुळे मंडळाकडील जमा उपकर निधी राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतवणूकीची मर्यादा रू.१५००/- कोटीमध्ये वाढ करणेबाबत विचारविनिमय करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित आला होता.

**ठराव क्र. ५५ (०७)/२०२० :- मंडळाकडे जमा उपकर निधीपैकी दि.०८.०७.२०२० अखेर १२ राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतवणूकीच्या रू.९३०० कोटीच्या गुंतवणुक गोषवाऱ्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच, यापुढे मंडळाकडे जमा उपकर निधीची राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतवणूकीची मर्यादा ठरविण्याचे अधिकार मंडळाच्या गुंतवणूक उपसमितीला प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला होता.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**



Scanned with CamScanner